स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्या शाखेतील 'अर्थशास्त्र' विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर केल्या जाणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

:: संशोधन विषय ::

'पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील निवडक मूलभूत सुविधांचा तुलनात्मक अभ्यास' (विशेष संदर्भ : सोलापूर व लातूर जिल्हा - 2010 ते 2017)'

:: संशोधक ::

अमोल अरूण पगार

(अर्थशास्त्र विभाग)

शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव ता. चाकूर

जि. लातूर 413524

:: मार्गदर्शक ::

प्रा. डॉ. व्ही.व्ही. सुकाळे

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

पदवी व पदव्युत्तर विभाग,

पीपल्स महाविद्यालय, नांदेड.

:: संशोधन केंद्र ::

पीपल्स महाविद्यालय, नांदेड.

मे - 2019

अनुक्रमणिका

अ.क्र.	विषय	पृष्ठ क्र.
1	प्रस्तावना	**1**
2	विषयनिवड	**7**
3	संशोधनाची उद्दिष्ट्ये	**7**
4	संशोधनाचे गृहितकृत्ये	**8**
5	संशोधन पध्दती	**8**
6	संशोधनाची व्याप्ती व मर्यादा	**9**
7	संशोधनाचा कालखंड	**10**
8	संशोधनाची उपयुक्तता	**10**
9	नियोजित प्रकरणे	**10**
10	संदर्भ सूची	**11**

'पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील निवडक मूलभूत सुविधांचा तुलनात्मक अभ्यास' (विशेष संदर्भ : सोलापूर व लातूर जिल्हा - 2010 ते 2017)'

प्रस्तावना :

जगातील कोणत्याही देशाची प्रगती ही तेथील शेती, उद्योग, व्यापार, मानवसंसाधन यांच्या विकासावर अवलंबून असते. शेतीच्या जलद विकासासाठी जलसिंचन, विज पुरवठा, वाहतूक, दळणवळणाची साधने यांची आवश्यकता असते. त्याचबरोबर औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी आधुनिक यंत्र-तंत्रे, कुशल मनुष्यबळ, चांगले व्यवस्थापन, भरपूर उर्जा संसाधने, वित्तीय सेवा, बाजारपेठा, वाहतूक व्यवस्था, मुबलक पाणी, आधुनिक संपर्क साधने यांची नितांत गरज असते. या सर्व सेवा सुविधांना एकत्रितरीत्या मूलभूत सेवा / पायाभूत संरचना (Infrastructural Facilities) असे म्हणतात.

जगातील कुठल्याही राष्ट्राला प्रगती पथावर जायचे असेल किंवा आपल्या विकासाचा दर टिकवायचा असेल तर मूलभूत सेवा अधिक प्रमाणात व चांगल्या दर्जाच्या असाव्या लागतात. इंग्लंडमध्ये 17 व्या शतकात औद्योगिक क्रांती झाली. त्याचे कारण तेथील सरकारने सर्वात आधी दळणवळणाच्या मजबूत सोयी उभारून व्यापार उद्योगाला चालना दिली आणि जगभर आपल्या वसाहती निर्माण केल्या. साधारणत: 1920 सालापर्यंत ब्रिटिशांनी पृथ्वीच्या 24% हिश्यावर आपल्या वसाहती निर्माण केल्या होत्या हे त्यांना केवळ मूलभूत सुविधांच्या उभारणीमुळेच करता आले.

आज ज्या देशात मजबूत आणि दर्जेदार मूलभूत सेवा आहेत अशीच राष्ट्रे विकसित आहेत. जगातील मूलभूत सुविधांचा दर्जा, गुणवत्ता व उपलब्धतता यानुसार Statista या जर्मन संस्थेच्या सर्व्हेनुसार क्षेत्रफळाच्या दृष्टीने अत्यंत लहान असणारा सिंगापूर प्रथम स्थानी आहे. अमेरिका 9 व्या स्थानी तर भारताचे स्थान 63 वे आहे. जगातील खूप देश भारताच्या पुढे आहेत. म्हणून मूलभूत सेवांची भक्कम उभारणी व त्यांचे संवर्धन याबाबत भारतात संशोधन होणे आवश्यक आहे. चांगली कार्यरत असणारी मूलभूत संरचना आधुनिक समाजाची आधारशिला आहे. व्यवसायातील संक्रमणांना सोयीसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्याबरोबरच पायाभूत सुविधांमुळे देशाची कार्यक्षमता सुधारते, नागरिकांच्या जीवमानाचा दर्जा उंचावतो. मूलभूत सुविधा आणि स्थूल देशांतर्गत उत्पादन यात सरळ संबंध आहे. मूलभूत सेवांच्या विस्ताराने राष्ट्राच्या उत्पादन पातळीत वाढ होते. देशाच्या आर्थिक विकासाला गती मिळते. म्हणूनच मूलभूत सेवा या राष्ट्र उभारणीचा पाया मानल्या जातात. पाया मजबूत झाला की इमारतही भक्कमपणे उभी राहते, त्याप्रमाणे भक्कम पायाभूत सेवांमुळे राष्ट्र उभारणीच्या कार्याला गती मिळते.

मूलभूत सुविधा (Infrastructural Facilities) :

उत्पादन प्रक्रियांना अप्रत्यक्षपणे मदत करणाऱ्या आर्थिक, सामाजिक आणि संस्थात्मक घटकांना 'मूलभूत सुविधा' असे म्हणतात.

मूलभूत सुविधांचे पुढीलप्रकारे वर्गीकरण केले जाते.

1. **आर्थिक मूलभूत सेवा :** यात रस्ते, रेल्वे, हवाई वाहतूक, जल वाहतूक, वीज, जलसिंचन, बँका, विमा कंपन्या, दळणवळण साधने जसे इंटरनेट, पोस्ट, टेलिग्राम इ. साधनांचा समावेश होतो.
2. **सामाजिक मूलभूत सेवा :** यात शिक्षण, आरोग्य, पाणी, स्वच्छता इ. समावेश होतो.

देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासात अप्रत्यक्षपणे अत्यंत महत्त्वाच्या भूमिका मूलभूत सुविधा पार पाडतात. शेती, उद्योग, व्यापार, मानव संसाधान इत्यादींसाठी या सेवा महत्त्वाच्या असून काही निवडक मूलभूत सुविधांबाबत थोडक्यात पुढीलप्रमाणे माहिती घेता येईल.

रस्ते वाहतूक (Road Transport) :

मानवी शरीरात ज्याप्रमाणे रक्त वाहिन्या रक्ताचे वहन करून आरोग्य व्यवस्थित ठेवतात, अगदी त्याचप्रमाणे रस्ते हे देशातील वाहतूकीचे कार्य करून अर्थव्यवस्थेचे आरोग्य सांभाळत असतात. जागतिक स्तरावर विचार केल्यास अमेरिका समृध्द आहे, म्हणून अमेरिकेतील रस्ते चांगले आहेत असे नाही, तर ते चांगले आहेत म्हणून अमेरिका समृध्द आहे. हे माजी अमेरिकन अध्यक्ष जॉन एफ केनडी यांचे विधान जगभर प्रसिध्द आहे. त्यांच्या या विधानावरून रस्त्याचे जाळे किती महत्त्वाचे आहे हे स्पष्ट होते. रस्ते हे विकासातील अत्यंत महत्त्वाची सेवा असून चांगले रस्ते देशाला समृध्द बनवत असतात. रस्त्यांचे प्रामुख्याने राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, जिल्हा रस्ते, वर्गीकृत रस्ते व अवर्गीकृत रस्ते असे प्रकार पडतात. भारतात जवळपास 5903293 कि.मी. रस्ते असून जगातील दुसऱ्या क्रमांकाचे रस्त्याचे जाळे भारतात आहे. भारतात दर चौ.कि.मी. क्षेत्रफळात 1.70 कि.मी. रस्ते असून भारतातील रस्त्यांची घनता चीन, ब्राझील, अमेरिका, रशिया, जपान या देशांपेक्षा अधिक आहे. तर भारतात जवळपास दर 1000 लोकसंख्येमागे 4.63 कि.मी. रस्ते उपलब्ध आहेत.

भारतात 1950-51 मध्ये 399942 कि.मी. इतके रस्ते होते. तर जाने 2019 अखेर 5903293 कि.मी. इतके रस्ते आहेत. रस्त्यांच्या विकासाला खरी सुरूवात 1995 पासून झाली. अनेक योजना रस्ते विकासासाठी सुरू झाल्या परिणामी आज बरेच चौपदरी रस्ते भारतात दिसतात. शेतमालाची वाहतूक असो, कच्च्या मालाची

वाहतूक असो किंवा उद्योगातील पक्का माल बाजार पेठेत पोहोचवण्यासाठी लवकर व स्वस्त दरात उपलब्ध होणारा वाहतूक प्रकार म्हणून रस्त्यांकडे पाहिले जाते. परंतु आज भारतातील व भारताच्या विविध राज्यातील विशेषत: महाराष्ट्रातील रस्त्यांची स्थिती समाधानकारक नाही. महाराष्ट्रातील मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र या विभागांमध्ये रस्त्यांच्या स्थितीबाबत खूप विषमता आहे. यबाबत संशोधन होणे गरजेचे वाटते.

पाणीपुरवठा (Water supply) :

पृथ्वीवरील सर्व सजीवांना पाणी हे अत्यंत महत्त्वाचे असून पाण्याशिवाय कुठलाही सजीव घटक जगू शकत नाही. पृथ्वीच्या एकूण पृष्ठभागापैकी 70.80% भूभाग पाण्याने व्यापला असून पृथ्वीवरील एकूण पाण्यापैकी 97% पाणी हे खारे आहे. फक्त 3% पाणी सजीवांना उपयोगी आहे. यावरून आपल्याला पाण्याचे महत्त्व लक्षात येते. या गोड पाण्यापैकी सुमारे 70% पाणी शेती, उद्योग, दळणवळण, बांधकाम इत्यादींसाठी वापरले जाते. पाणी हा घटक देशाच्या अर्थव्यवस्थेत अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतो. जगातल्या ज्या देशांना पाण्याचे योग्य नियोजन करता आले, ते देश विकसित आहेत. भारत हा विशालकाय लोकसंख्या असणारा देश असून भारतात पाण्याचे योग्य नियोजन होणे व सर्व सजीवांना योग्य प्रमाणात पाणी पुरवठा होणे आवश्यक आहे. भारतात दरवर्षी साधारणत: 890 मी.मी. पाऊस पडतो. भारतात भूपृष्ठ व भूगर्भातील मिळून 39641.9 TMC पाणी असून यापैकी 15284 TMC म्हणजेच जागतिक तुलनेत 4.66% इतके पाणी मानवी वापरासाठी उपलब्ध आहे. एकूण जागतिक भुभागापैकी भारताने 2.4% भूभाग व्यापला असून सध्या पृथ्वीवर वास्तव्य करीत असलेल्या 7.7 अब्ज लोकसंख्येपैकी भारतात 121.09 कोटी म्हणजेच 17% लोकसंख्या आहे. म्हणजेच जागतिक तुलनेत भारतात जमिनीच्या क्षेत्रफळापेक्षा मानवी वापरास उपलब्ध असणाऱ्या पाण्याचे प्रमाण जास्त असले तरी उपलब्ध असणाऱ्या पाण्याच्या प्रमाणापेक्षा लोकसंख्येचे प्रमाण तीन पटीपेक्षा अधिक आहे. अनियमित, अनिश्चित मान्सून पर्जन्य आणि उपलब्ध पाण्याच्या योग्य व्यवस्थापनाचा अभाव यामुळे देशात तसेच महाराष्ट्रात जलसमस्येने गंभीर स्वरूप धारण केले आहे. पश्चिम महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण बऱ्यापैकी असते आणि तेथील पाण्याचे नियोजन चांगले असते त्यामुळे दुष्काळाची झळ या भागात सहसा पोहचत नाही, मराठवाड्यात मात्र सातत्याने दुष्काळ सदृश्य परिस्थिती असते. सोलापूर व लातूर हे दोन्ही वेगवेगळ्या विभागातील जिल्हे असून दोन्ही जिल्ह्यांमध्ये पाऊस अत्यल्प पडतो; परंतु लातूर जिल्ह्यांचा पाणीप्रश्न मात्र देश पातळीवर गाजतो. याबाबत नियोजनात कमतरता आहे की वितरणातील असमानता आहे याविषयी संशोधन होणे आवश्यक आहे.

वीज (Electricity) :

आधुनिक अर्थव्यवस्था ही विजेवर चालणारी अर्थव्यवस्था असते असे म्हटले जाते. कारण आज विजेशिवाय कुठलेच कार्य शक्य नाही. म्हणून विजेला देशाच्या प्रगतीचे गमक मानले जाते. वीज प्रामुख्याने शेती, उद्योग, व्यापारी संस्था, वाहतूक, दळणवळणाची साधने घरगुती वापर इ. ठिकाणी वापरली जाते. या सर्वच क्षेत्रात आर्थिक प्रगतीबरोबर विजेची मागणी सतत वाढत आहे. मात्र मागणीच्या मानाने विजेचा पुरवठा मात्र अपूर्ण पडत आहे. World Bank च्या मते मे 2018 पर्यत भारतातील 85% लोकांपर्यत विज पोहचली असून 15% लोकापर्यंत अद्यापही वीज पोहचली नाही. म्हणजेच 18.5 कोटी लोक आजही अंधारात जीवन व्यतीत करतात. ही खूप विचार व संशोधन करण्यासारखी बाब आहे. भारतात विजेचे एकूण उत्पादन प्रतिवर्ष 1497000 Gwh असून जगातील तिसऱ्या क्रमांकाचा वीज उत्पादक देश म्हणून भारताची ओळख आहे. वीज वापराबाबत भारताचा जगात 5 वा क्रमांक लागतो. सरकार सातत्याने विजेचे परिपूर्ण उत्पादन करण्याचा व जास्तीत जास्त लोकांपर्यंत वीज कशी पोहचेल आणि लोकांच्या जीवनात कसा प्रकाश पडेल यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे. परंतु तरीही 100% विजेच लक्ष आपण गाठू शकलो नाही. मग 21 व्या शतकात विकसित राष्ट्रांबरोबर सर्वच क्षेत्रात आपण कशी स्पर्धा करणार? त्यासाठी आपल्या ऊर्जा क्षेत्रातील प्रगतीकडे किती लक्ष द्यावे लागणार? या विचार करण्यासारख्या बाबी आहेत. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यातही 24 तास वीज देणे शासनाला शक्य नाही. अविकसित व मागास भागात विजेचा खूप अनुशेष आहे. याबाबत नक्कीच संशोधन होणे गरजेचे आहे.

बँका व वित्तीय संस्था (Bank and Financial Institutions) :

प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेत बँक व्यवस्थेला अनन्यसाधारण महत्त्व असते. विविध बँका व वित्तीय संस्था शेती, उद्योग, व्यापार यासारख्या क्षेत्रांना भांडवल पुरवठा करतात. बँका शाखा विस्ताराद्वारे अधिकाधिक ग्राहकांपर्यत पोहचतात, जनतेकडील ठेवी संग्रहित करतात, जनतेमध्ये काटकसरीची व बचतीची सवय लावतात. या ठेवी कर्ज पुरवठा करण्यासाठी बँका वापरतात. यामुळे भांडवल निर्मितीची प्रक्रिया गतिमान होते आणि अर्थव्यवस्थेतील विविध घटकांच्या विकासाला चालना मिळते. भारतात बँकिंगचा उदय 18 व्या शतकात झाला पण भारतात 1969 व 1980 मध्ये झालेल्या राष्ट्रीयीकरणानंतर लोकांच्या कल्याणासाठी बँका कार्य करू लागल्या. आजही काही बँका सरकारी, काही राष्ट्रीयकृत तर काही खाजगी व सहकारी तत्त्वावर कार्यरत असून त्या मोठ्या प्रमाणात ठेवी गोळा करून कर्जाचे वाटप करीत आहेत.

महाराष्ट्रात 31 मार्च 2017 अखेर अनुसूचित वाणिज्य बँकाची संख्या 12191 असून देशातील एकूण बँक कार्यालयांपैकी 9% कार्यालये एकट्या महाराष्ट्रात आहेत. त्यापैकी 24.9% कार्यालये ग्रामीण भागात तर 22.9% निमनागरी व 52.2% नागरी भागात कार्यरत आहेत. भारतात प्रति 9720 लोकांमागे एक बँक तर महाराष्ट्रात 9965 लोकांमागे एक बँक असे बँकांचे प्रमाण आहे. राज्यातील कर्ज व ठेवी प्रमाण 106.3% होते तर अखिल भारतीय पातळीवर ते 73.37% होते. बँकिंग क्षेत्राची राज्याची प्रगती देशापेक्षा वरकड आहे. असे असले तरी राज्यातील बऱ्याच भागात बँकिंग सोयीचा तुटवडा आहे. डिजीटल युगात बँकिंग सुविधा खेड्यापाड्यापर्यंत पोहचवलेल्या नाहीत याबाबत नक्कीच संशोधन होण आवश्यक आहे..

आरोग्य (Health) :

व्यक्ती, कुटूंब, समाज आणि राष्ट्र यांच्या प्रगतीचे मोजमाप करण्यासाठी जे काही निकष वापरले जातात, त्यात आरोग्य हा एक महत्त्वपूर्ण निकष मानला जातो. चांगल्या आरोग्याशिवाय आपण विकासाची कल्पना देखील करू शकत नाही यामुळेच जगातील प्रत्येक राष्ट्राने आरोग्याला प्राधान्य दिले आहे. भारत सरकारने सन 2000 पर्यंत सर्वांना चांगले आरोग्य देण्याची घोषणा करून समाज बांधिलकी जपण्याचा प्रयत्न केला आहे.

सुखी, संपन्न व विकसित राष्ट्राची निर्मिती करावयाची असेल तर देशातील नागरिक निरोगी असणे आवश्यक आहे. त्यासाठी स्वच्छ हवा, शुध्द पाणी, सकस आहार, प्रदुषणविरहित पर्यावरण, चांगले दवाखाने आणि जीवनावश्यक गरजांची पूर्तता करण्याइतपत दरडोई उत्पन्न इ. बाबींची आवश्यकता असते. या सर्व बाबी जेव्हा उपलब्ध होतात तेव्हा मानवी आरोग्य धोक्यात येत नाही. आज आपल्या देशात दरडोई उत्पन्नाची कमतरता व दारिद्र्याचे मोठे प्रमाण आहे. यामुळे आरोग्याचा प्रश्न खूप गंभीर बनला आहे. वाढते कारखाने, पर्यावरणाचा वाढता ऱ्हास, वाढते जल प्रदूषण, हवा प्रदूषण, धुम्रपान, नशापान करणाऱ्यांची वाढणारी संख्या, अनावश्यक आहाराचे सेवन इ. कारणांमुळे अनेक रोग जन्माला आले आहेत. यासाठी पुरेशा आरोग्याच्या सुविधा उपलब्ध असतील तर सामाजिक आरोग्य ठीक राहील.

भारतात आरोग्याचा विचार केला तर कमालीची विषमता जाणवते. केरळमध्ये बालमृत्यूदर 6 आहे तर उत्तरपद्रेशात 64 आहे. याचे मुख्य कारण कुपोषण असून सकस आहार न मिळणे त्याचा सरळ संबंध दारिद्र्याशी आणि उत्पन्न मिळवण्याच्या साधनांशी निगडित आहे. सार्वजनिक स्तरावर सरकारतर्फे खूप योजना व खर्च केला जातो पण, मार्टीन पेट्रीक यांनी केलेल्या सर्व्हेक्षणानुसार भारतातील जास्तीत जास्त लोक सार्वजनिक आरोग्य सुविधांवर अवलंबून न राहता खाजगी आरोग्य सेवांकडे

वळतात. खाजगी आरोग्य सेवेचे दर सार्वजनिक सेवांपेक्षा 24 पट अधिक असूनसुध्दा लोकांचा सरकारी साधनांवर विश्वास नाही.

महाराष्ट्र हे भारतातील पुरोगामी राज्य असून आरोग्य सुविधा विकसित करण्यात ते अग्रेसर आहे. येथे सार्वजनिक, खाजगी व स्वंयसेवी संस्था यांच्यामार्फत विश्वासार्ह आरोग्य सेवा पुरविल्या जातात, तरीही बालमृत्यू दर, कुपोषण, साथीचे रोग, दुर्धर आजार, यांपासून राज्य मुक्त होवू शकले नाही. ग्रामीण भागातील अनेक खेड्यात दवाखाने पोहचले नाहीत. म्हणून कितीतरी लोक आज उपचाराविना मरण पावतात. ही बाब विचार करायला लावणारी आहे.

पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील मूलभूत सुविधा : भारतात 29 घटक राज्य व 6 केंद्र शासित प्रदेश असून इंडिया टुडे यांनी 2017 मध्ये केलेल्या सर्व्हेक्षणानुसार मूलभूत सेवांच्या बाबतीत हिमाचल प्रदेश प्रथम क्रमांकाचे तर गुजरात हे द्वितीय क्रमांकाचे राज्य असून महाराष्ट्र राज्यात मूलभूत सेवा 5 व्या क्रमांकांच्या आहेत. महाराष्ट्र हे भारतातील गतिमान विकास करणारे राज्य असून महाराष्ट्राचे पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, कोकण, खानदेश असे पाच भौगोलिक विभाग असून राज्याच्या सहा प्रशासकीय विभागांची रचनाही सर्वसाधारणपणे या भौगोलिक विभागानुसारच करण्यात आली आहे. सन 2011 च्या जनगणनेप्रमाणे राज्यातील सुमारे निम्मी लोकसंख्या कोकण व पश्चिम महाराष्ट्रात राहते, तर मराठवाड्यात सुमारे 16.7% लोकसंख्या राहते. विकासाच्या बाबतीत या पाचही विभागांमध्ये खूप विषमता आहे. पश्चिम महाराष्ट्र व कोकण अधिक विकसित आहेत तर मराठवाडा, विदर्भ, खानदेश हे प्रदेश मागास आहेत. मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र यांच्यात विकासाच्या बाबतीत खूप तफावत आहे. पश्चिम महाराष्ट्रात दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या 9% तर मराठवाड्यात 22% आहे. पश्चिम महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न मराठवाड्यापेक्षा जास्त आहे. पश्चिम महाराष्ट्रात शेती, उद्योग यांचा विकास झाला आहे, तर मराठवाड्यात सतत पाण्याचा दुष्काळ व शेती अविकसित असून उद्योगांचा फारसा विकास झाला नाही. पश्चिम महाराष्ट्रातील मूलभूत सेवा मराठवाड्यापेक्षा चांगल्या व अधिक आहेत. पश्चिम महाराष्ट्रात एकूण 6 जिल्हे असून त्यात सोलापूर हा अत्यंत महत्त्वपूर्ण जिल्हा आहे. या जिल्ह्यास महाराष्ट्राचे ज्वारीचे कोठार असे देखील म्हणतात. चादरी उत्पादनसाठी या जिल्ह्याचा देशभरात नावलौकिक असून 14895 चौ.कि.मी. क्षेत्रफळ 11 तालुके व 4317756 इतकी लोकसंख्या या जिल्ह्याची असून पंढरपूर व मंगळवेढा ही तीर्थक्षेत्रे येथे आहेत, तर लातूर हे मराठवाड्यातील शिक्षणाचे केंद्र म्हणून प्रसिध्द असून या जिल्ह्यात 10 तालुके, 7157 चौ.कि.मी. क्षेत्रफळ व 2080283 इतकी लोकसंख्या आहे.

सोलापूर व लातूर हे महाराष्ट्रातील दोन वेगवेगळ्या भौगोलिक विभागातील जिल्हे असून ह्या जिल्ह्यांच्या सिमा एकमेकाला लागून आहेत. आर्थिक, सामाजिक व मूलभूत सेवांच्या बाबतीत (रस्ते, वीज, पाणी, आरोग्य, वित्त संस्था) दोन्ही जिल्ह्यातील परिस्थिती भिन्न भिन्न असून त्याचा अभ्यास करण्याची उणीव भासत होती म्हणून जाणीवपूर्वक **'पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील निवडक मूलभूत सुविधांचा तुलनात्मक अभ्यास'** करण्याची गरज आहे.

विषयनिवड (Selection of Topic) :

मूलभूत सुविधा ह्या कुठल्याही राष्ट्राच्या विकासात अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडतात. जलद आर्थिक विकासासाठी चांगल्या मूलभूत सुविधा ही पूर्वअटच आहे. महाराष्ट्र हे भारतातील जलद आर्थिक विकास करणारे राज्य असून महाराष्ट्राच्या पाच भौगोलिक विभागात विकासाच्या तसेच सामाजिक, आर्थिक मूलभूत सुविधांच्या बाबतीत खूप विषमता आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील पश्चिम महाराष्ट्र प्रगत झाला तर मराठवाड्यासारखा प्रदेश मागास राहिला. या दोन्ही प्रदेशातील मूलभूत सुविधांची स्थिती भिन्न आहे. म्हणून जाणीवपूर्वक पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर व मराठवाड्यातील लातूर या दोन जिल्ह्यांतील निवडक मूलभूत सुविधांचा तुलनात्मक अभ्यास करण्याच्या दृष्टीने आणि याबाबत संशोधनाची उणीव भासत असल्याने **'पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील निवडक मूलभूत सुविधांचा तुलनात्मक अभ्यास' (विशेष संदर्भ : सोलापूर व लातूर जिल्हा - 2010 ते 2017)'** या विषयाची निवड केली आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये (Objectives of Research) :

1. पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील निवडक मूलभूत सुविधांचा अभ्यास करणे.
2. पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील निवडक मूलभूत सुविधांची तुलना करणे.
3. सोलापूर व लातूर जिल्ह्यातील विज, रस्ते, पाणी, बँका, आरोग्य इ. ची तुलना करणे.
4. मराठवाड्यात व लातूर जिल्ह्यात निवडक मूलभूत सुविधा कमी असण्याच्या कारणांचा शोध घेणे.
5. ज्या प्रदेशात मूलभूत सुविधांचे प्रमाण कमी आहे ते वाढवण्यासाठी उपाय सुचवणे.

गृहितकृत्ये (Hypothesis) :

1. पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा विभाग यांच्यात रस्ते, वीज, पाणी, आरोग्य, बँका या निवडक मूलभूत सुविधाबाबत असमानता आहे.
2. पश्चिम महाराष्ट्रात मूलभूत सुविधांची उपलब्धता अधिक आहे.
3. मराठवाड्यातील मूलभूत सुविधा पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनात्मकदृष्ट्या कमी आहेत.
4. सोलापूर जिल्ह्याच्या तुलनेत लातूर जिल्ह्यात निवडक मूलभूत सुविधांचे प्रमाण कमी आहे.

संशोधन पध्दती (Research Methodology) :

'संशोधन म्हणजे नवीन ज्ञान संपादन करण्यासाठी केलेले विशेष प्रयत्न किंवा कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन घटनांसाठी संशोधनातून चिकित्सकरीत्या केलेल विश्लेषण होय.' संशोधनाचे प्रमुख दोन प्रकार पडतात. शास्त्रीय संशोधन व सामाजिक संशोधन. प्रस्तुत संशोधन हे सामाजिक संशोधन असून ते उपयोजित संशोधन (Applied Research) या प्रकारात येते.

उपयोजित संशोधन (Applied Research) : विशिष्ट अडचणीचे निराकरण हा उपयोजित संशोधनाचा हेतू असतो. प्रस्थापित उपपत्तीचे जेव्हा सुसंगत व समर्पक परिस्थितीत उपयोजन केले जाते किंवा एखादी समस्या सोडवण्यासाठी जेव्हा पूर्वप्रस्थापित उपपत्तीचा अवलंब केला जातो तेव्हा त्या संशोधनाला उपयोजित संशोधन असे म्हणतात. एखादी विशिष्ट समस्या संशोधकाच्या अवतीभोवती प्रखर स्वरूप धारण करते. त्यामुळे अस्वस्थ, असमाधानी संशोधक त्या समस्येचे शास्त्रीय पध्दतीने उत्तर शोधण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा ही संशोधन प्रक्रिया घडून येते. उपयोजित संशोधनाचा व्यवहाराशी निकट व अतूट संबंध असतो. हे संशोधन मूलभूत स्वरूपाचे संशोधन नसल्यामुळे संशोधकाने संबंधित विषयाचा फार सूक्ष्म व सखोल अभ्यास केला नाही, तरी चालतो; परंतु समस्येशी संबंधित आवश्यक माहिती व ज्ञान अवगत करणे आवश्यक असते.

माहिती संकलन (Data Collection) :

प्रस्तुत संशोधनात मुलाखत अनुसूची, निरीक्षण इ. तथ्य संकलनाच्या तंत्राचा वापर करण्यात येणार असून महाराष्ट्र व पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील दुय्यम सामग्रीच्या सहाय्याने विश्लेषण व तुलनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे. त्यासाठी प्राथमिक व दुय्यम सामग्रीचा आधार घेण्यात येणार आहे.

अ) दुय्यम सामग्री संग्रहण :

जी तथ्ये इतर व्यक्ती किंवा संस्था यांनी संकलित केलेली असतात अशा सामग्रीला दुय्यम सामग्री असे म्हणतात. यात संदर्भग्रंथे, नियतकालिके, विशेषांक, शासकीय अहवाल, वृत्तपत्रातील लेख, संशोधनपर लिखित साहित्य, जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, भारताची व महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल, आर.बी.आय. बुलेटिन, भारताचे अर्थसंकल्पपूर्व सर्वेक्षण, ई-बुक्स, इंटरनेटवर उपलब्ध माहिती इत्यादींचा आधार घेण्यात येणार आहे.

ब) प्राथमिक सामग्री संग्रहण :

संशोधक स्वत: अध्ययन क्षेत्रात जावून त्या समस्येशी संबंधित माहिती संकलित करतो. तेव्हा त्यास प्राथमिक सामग्री संग्रहण असे म्हणतात. प्रस्तुत संशोधनात मुलाखत, अनुसूची व निरीक्षणाच्या साहाय्याने माहिती गोळा करून तिचे विश्लेषण केले जाणार आहे. त्यासाठी सोलापूर व लातूर जिल्ह्यातील नागरिक व मूलभूत सेवा क्षेत्रात कार्यरत अधिकारी-कर्मचारी यांच्या मुलाखती घेवून अनुसूची भरून घेण्यात येणार आहेत. तसेच वस्तुनिष्ठ माहिती संकलनासाठी निरीक्षण पध्दतीचीहा वापर करण्यात येणार आहे.

क) नमुना निवड :

प्रस्तुत संशोधनात नमुना निवड पध्दत वापरण्यात येणार असून "बोगार्डस यांच्या मते एका पूर्व निर्धारित योजनेनुसार एककांच्या एका समुहामध्ये एक निश्चित प्रतिशत म्हणजे नमुना निवड होय."

प्रस्तुत संशोधनात सहेतूक नमूना निवड पध्दतीचा वापर करण्यात येणार असून लातूर व सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येकी 200 व्यक्ती नमुना म्हणून निवडल्या जाणार आहेत. तसेच मूलभूत सुविधा क्षेत्रात कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संपर्क करून त्यांच्या मुलाखती व अनुसूचीद्वारे माहिती संकलित करण्यात येणार आहे. तसेच या संकलित सामग्रीचे विश्लेषण करण्यासाठी विविध सांख्यिकीय साधनांचा उपयोग केला जाणार आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा (Scope and Limitations of Research):

प्रस्तुत संशोधन हे निवडक मूलभूत सेवा म्हणजेच रस्ते, विज, पाणीपुरवठा, आरोग्य, बँका इत्यादींच्या सदंर्भातच असून लातूर व सोलापूर जिल्हा एवढ्या क्षेत्रापुरतेच मर्यादित आहे आणि नमुना निवडलेल्या सोलापूर व लातूर जिल्ह्यातील नागरिक व अधिकारी यांच्या प्रतिसादावर अवंलबून असून नमुना निवड पध्दतीच्या

मर्यादा या संशोधनला लागू पडतात. तसेच प्रस्तुत संशोधन हे याच प्रकारची भौतिक, सामाजिक, आर्थिक परिस्थिती असलेल्या भारतातील इतर भागांना लागू पडेल.

संशोधनाचा कालखंड (Period of Research) :

प्रस्तुत अध्ययनाची व्याप्ती स्थूल अध्ययनासाठी महाराष्ट्रातील पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा विभागाइतकी मर्यादित असून ती सूक्ष्म अध्ययनासाठी लातूर व सोलापूर जिल्ह्यापुरती मर्यादित आहे. या अध्ययनाचा कालावधी 2010 ते 2017 असा निश्चित करण्यात आला आहे.

संशोधनाची उपयुक्तता (Utility of Research) :

मूलभूत पायाभूत सुविधा ह्या आर्थिक विकासाच्या निर्देशकबाबी असून शेती, उद्योग, व्यापार, सेवा यांच्या विकासाला गती देणारी ती अप्रत्यक्ष साधने आहेत. सोलापूर व लातूर या दोन जिल्ह्यांना अनुक्रमे पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्याचे प्रतिनिधी मानून या दोन विभागातील निवडक मूलभूत सुविधांचा तुलनात्मक अभ्यास या संशोधनात करण्यात येणार आहे. देशाला समृध्द करण्यासाठी मूलभूत सेवा किती उपयुक्त आहेत? त्याची जाणीव प्रस्तुत संशोधनात होणार आहे. तसेच या जिल्ह्यात मूलभूत सेवांचा दर्जा कसा आहे? तो कितपत सुधारला पाहिजे? या बाबतीत निष्कर्ष काढून उपाययोजना सुचवता येतील काय? याबाबत अंदाज बांधता येईल. हा अभ्यास केंद्र व राज्य सरकार, नीति आयोग, प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या समित्या, वित्तीय संस्था, शेतकरी, उद्योजक, व्यापारी आणि संशोधक यांना नक्कीच उपयुक्त ठरेल.

नियोजित प्रकरणे :

1) मूलभूत सुविधा व आर्थिक विकास :

प्रस्तुत प्रकरणात मूलभूत सुविधांचा अर्थ, व्याख्या, महत्त्व, प्रकार, त्यांचे आर्थिक विकासातील योगदान, जागतिक पातळीवर सद्यस्थितीत मूलभूत सुविधांचा आढावा, भारतातील मूलभूत सुविधांचा, ऐतिहासिक व सद्यस्थितीचा आढावा, विविध राज्यातील व महाराष्ट्रातील मूलभूत सुविधांची स्थिती याबाबत विश्लेषण करण्यात येणार आहे.

2) संशोधन साहित्याचे सिंहावलोकन व संशोधन पध्दती :

या प्रकरणात विषयाशी संबंधित इतर संशोधकांनी केलेल्या अभ्यासाचा आढावा घेतला जाणार आहे. प्रस्तुत संशोधनासाठी कोणती पध्दती वापरली आहे. याचे विश्लेषण येणार आहे.

3) पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील मूलभूत सुविधांचा अभ्यास :

या प्रकरणात पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील आर्थिक, सामाजिक, राजकीय व भौगोलिक स्थितीचे विश्लेषण करण्यात येणार आहे. तसेच रस्ते, विज, पाणी, बँका, आरोग्य इ. मूलभूत सुविधांच्या संदर्भात सन 2010 ते 2017 पर्यंतचा अभ्यास करून विवेचन करण्यात येणार आहे.

4) सोलापूर जिल्ह्यातील मूलभूत सुविधांचा अभ्यास :

या प्रकरणात सोलापूर जिल्ह्यातील आर्थिक, सामाजिक व भौगोलिक स्थितीचे विश्लेषण करण्यात येणार आहे. तसेच रस्ते, विज, पाणी, बँका, आरोग्य इ. मूलभूत सुविधांचा सन 2010 ते 2017पर्यंतचा अभ्यास करून विश्लेषण करण्यात येणार आहे.

5) लातूर जिल्ह्यातील मूलभूत सुविधांचा अभ्यास :

या प्रकरणात लातूर जिल्ह्यातील आर्थिक, सामाजिक व भौगोलिक स्थितीचे विश्लेषण करण्यात येणार आहे. तसेच रस्ते, विज, पाणी, आरोग्य, बँका व वित्त संस्था इ. मूलभूत सुविधांचा सन 2010 ते 2017 या काळातील अभ्यास करण्यात येवून विश्लेषण करण्यात येणार आहे.

6) सोलापूर व लातूर जिल्ह्यातील निवडक मूलभूत सुविधांचा तुलनात्मक अभ्यास :

या प्रकरणात नमुना निवडून निरिक्षण, मुलाखती व अनुसूचीद्वारे संग्रहित केलेल्या मूलभूत सुविधांबाबतच्या माहितीचे नागरिक व अधिकारी यांच्या प्रतिसादाच्या अनुषंगाने विश्लेषण व तुलना करण्यात येणार आहे.

7) निष्कर्ष व शिफारसी :

या प्रकरणात सोलापूर व लातूर जिल्ह्यातील मूलभूत सामाजिक सुविधांच्या स्थिती संदर्भात प्रमुख निष्कर्ष मांडले जाणार असून त्यावर योग्य त्या उपाययोजना सुचवल्या जाणार आहेत.

संदर्भ सूची :

1. Majumdar Rajarshi - **"Infrastructure & Development In India"**, Rawat Publication, 1 Dec. 2008.
2. Mashrique Ahmad - **"Development of Economic Infrastructure in India"**, Vdm Verlag, 15 Dec. 2010.
3. Mani N, Infrastructure Development & Financing in India, "New Century Publications, 5 Nov. 2012.

4. Jetli, K. Narindr & Sethi Vishali, **"Infrastructure Development in India : post liberalization Initiatives & challenges",** New century publications, 1 Jan 2017.
5. Mujamdar R.C., **"The Mughul Empire",** Bhartiya Vidya Bhavan Bombay, First Edition, 1974.
6. Economic Survey of India, 2017-18.
7. https://www.statista.com/statistics/264753/ranking-of-contriestothe general quality of infrastructure
8. https://en.m.wikipedia.org/wiki/british-empire
9. https://en.m.wikipedia.org/wiki/indianroad
10. https://en.m.wikipedia.org/wiki/electric encergy
11. www.indiatoday.in/state of the states. ranking-2018.
12. www.hingi.indiawaterportal.org/o/node/50767.
13. दत्त एवं सुदरम, **"भारतीय अर्थव्यवस्था",** एस चांद ॲण्ड कंपनी प्रा.ली., दिल्ली, 55 वी आवृत्ती, 2016.
14. पुरी & मिश्रा, **"भारतीय अर्थव्यवस्था"**, हिमालया प्रकाशन, दिल्ली, 2014.
15. प्रा. रायखेलकर, डॉ. दामजी, **"भारतीय अर्थव्यवस्था",** विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, जानेवारी 2013.
16. प्रा. चव्हाण, एन.एल., **"भारतीय अर्थव्यवस्था",** प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथम आवृत्ती, 2009.
17. डॉ. पवार सुर्यकांत, **"भारतीय अर्थव्यवस्था",** स्वंयदीप प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, ऑक्टो. 2014.
18. डॉ. कुरूलकर र.पू., **"भारतीय अर्थशास्त्र",** विद्या प्रकाशन, नागपूर, जाने. 2001.
19. डॉ. जंगले मंगला, **"महाराष्ट्राची अर्थव्यवस्था",** प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथम आवृत्ती, 2008.
20. डॉ. कुरूलकर र.पू., **"महाराष्ट्राची अर्थव्यवस्था",** विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, 1997.
21. डॉ. पाटील जे.एफ., **"महाराष्ट्राची आर्थिक पाहणी पर्यायी दृष्टिकोन",** श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर, फेब्रु. 2015.
22. डॉ. धनगर धनराज (संपा.), **"महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता",** स्वातीधन पब्लिकेशन, विशेषांक 90(B), जाने. 2019.
23. डॉ. पवार जयसिंगराव व पवार वसुधा, **"आधुनिक हिंदूस्थानचा इतिहास",** विद्या प्रकाशन, नागपूर, द्वितीय आवृत्ती
24. खेर, सी.पी., **"आर्थिक सुधारणांचे नवे पर्व",** दिलीपराज प्रकाशन प्रा.ली. पुणे, प्रथम आवृत्ती, 1999.

25. डॉ. नारगोंडे गुरूनाथ द., **"सामाजिक संशोधन पध्दती",** फडके प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती दुसरी, 1999.
26. डॉ. कऱ्हाडे, बी.एम., **"शास्त्रीय संशोधन पध्दती",** पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लीशर्स, नागपूर, आवृत्ती तिसरी, 2011.
27. डॉ. बोधनकर, प्रा. आलोणी, ॲड. कुलकणी, **"सामाजिक संशोधन पध्दती",** साईनाथ प्रकाशन, नागपूर, सातवी आवृत्ती, 2014.
28. कचोळे, दा.धो., **"सामाजिक संशोधन पध्दती",** कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद, 1993.
29. आगलावे प्रदीप, **"सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे",** श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2010, आवृत्ती तिसरी.
30. कुलकर्णी, बी.डी. व ढमढरे, एस.व्ही., **"अर्थशास्त्रीय संशोधन पध्दती",** डायमंड पब्लीकेशन, पुणे, सप्टे. 2007, आवृत्ती प्रथम.
31. योजना अंक एप्रिल 2009, ऑक्टो. 2012, जून 2015, मे 2015.
32. अर्थसंवाद, ऑक्टो-डिसें. 2016, खंड-40, अंक-3.
33. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2011-12 ते 2017-18.
34. लातूर जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन 2011-12 ते 2017-18.
35. दै. लोकसत्ता, 4 मे 2018.

संशोधक

अमोल अरूण पगार

(अर्थशास्त्र विभाग)

शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

ता. चाकूर जि. लातूर 413524

मार्गदर्शक

प्रा. डॉ. व्ही.व्ही. सुकाळे

अर्थशास्त्र विभागप्रमुख,

पदवी व पदव्यूत्तर विभाग,

पीपल्स महाविद्यालय, नांदेड.